# महाराष्ट्र विधानसभा

**द्वितीय अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील डॉक्टरांचे पद पुर्णवेळ रिक्त असल्याबाबत**

**(१) ३७७९४ (१८-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे येथील प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे राष्ट्रीय उद्यानातील २१ प्राण्यांचा सन २०२१ मध्ये विविध कारणांमुळे मृत्यू झाला असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राणी संग्रहालयातील प्राण्यांची दैनंदिन तपासणी करणे, आजारी किंवा जखमी असल्यास त्यांच्यावर उपचार करणे, प्राण्यांसाठी येणाऱ्या खाद्याच्या गुणवत्तेची तपासणी करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय उद्यानात वैद्यकीय अधिकाऱ्यांचा २४ तास मुक्काम असणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात पुर्णवेळ वैद्यकीय अधिकाऱ्याचे पद तातडीने नियुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथे सन २०२१ मध्ये १३ वन्यप्राण्यांचा प्रामुख्याने वृध्दापकाळाने व कर्करोग या नैसर्गिक कारणांमुळे तर पावसाळयाच्या काळात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडयांमध्ये स्थानिक बकऱ्यांपासून मृगविहारातील ८ चौशिंगा जातीच्या प्राण्यांना Peste Des Petits Ruminants (PPR) या विषाणुजन्य रोगाचे संक्रमणामुळे अशा एकूण २१ वन्यप्राण्यांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आजारी जनावरांच्या उपचाराकरीता मुंबई पशुवैद्यकिय महाविद्यालयातील तज्ज्ञांचा सल्ला घेऊन आदिवासी पाडयांमध्ये असलेल्या सर्व पाळीव बकऱ्यांचे लसीकरण करण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) राज्यात वन विभगातील पशुवैद्यकीय अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम दिनांक २७.०६.२०२३ रोजी अधिसुचित करण्यात आले आहेत. सेवाप्रवेश नियमास अनुसरुन पशुवैद्यकीय अधिकारी या पदाचे मागणीपत्र महाराष्ट्र लोक सेवा आयोगास सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तथापि सद्यस्थितीत महसूल व वन विभाग, दिनांक १३.०६.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये श्रीमती विनया जंगले, पशुधन विकास अधिकारी यांची पशुवैद्यकीय अधिकारी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

---

**विस्तारीत बोर अभयारण्यातील विस्थापीत गावांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२) ३९५६९ (१८-०४-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा माळेगांव (ठेका), मेटहिरजी, उमरविहरी, येनिदोडका, मरकसुर ही गांवे बोर धरण व्याघ्र प्रकल्पालगत असून या गावांना जंगली प्राणी, वाघ, बिबटे, अस्वल, रानडुकरे व इतर प्राण्यांचे गावकऱ्यांवर जीवघेणे हल्ले होत आहेत हे खरे आहे काय,

(२) तसेच बोर अभयारण्याच्या विस्तारीकरणाचे प्रथम टप्प्यामध्ये समावेश करण्यात आलेल्या गरमसुर, एपीदोडका, मेटहिरजी, उमरविहीर व मरकसुर या गावांचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पुनर्वसन करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात नागरिकांना बोर व्याघ्र प्रकल्पातंर्गत असलेली शेतकऱ्यांची शेती व गावे व्याघ्र प्रकल्पात समाविष्ठ करुन त्यांचे पुर्नवसन करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०१-२०२४) :** (१) सदर गावांचा बोर व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात समावेश होतो. सन २०१८ मध्ये श्री. मनोहर जानबा कुळमेथे, वय ५५ वर्ष रा. मेटहिरजी हे वाघाच्या हल्ल्यात जखमी झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. प्रस्तुत प्रकरणी संबंधितास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) व (३) सदर गावे बोर व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रामध्ये समाविष्ट असून त्यांना अभयारण्यामध्ये समाविष्ट करुन पुनर्वसन करण्याची मागणी होत आहे. त्या अनुषंगाने सदर गावांचे पुनर्वसन करावयाचे झाल्यास आवश्यक असणाऱ्या आर्थिक तरतूदीबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी शासन स्तरावर निर्णय घेणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**शेपवाडी (ता .अंबाजोगाई, जि. बीड) येथील इनाम जमिनीच्या खरेदी विक्रीबाबत**

**(३) ४५८३४ (२५-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेपवाडी (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथील सर्वे.नं. १५५ तसेच अंबाजोगाई येथील १८०, १८१, १८३ ह्या इनाम जमिनी असून सदर जमीनी भोगवटा - २ ची असताना विनापरवाना भोगवटा-१ करण्यात आल्या तसेच सदर जमिनीची खरेदी विक्री होऊन त्यावर खाजगी लोकांची नावे लावण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनी सक्षम प्रधिकारी यांची मान्यता नसताना विनापरवाना भोगवटा-२ च्या भोगवटा-१ करण्यात आल्याने जमिनी परत भोगवटा-२ करण्याबाबत तहसीलदार, अंबाजोगाई यांना आदेश असतानाही अद्याप तसे करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) व (२) स.नं.१८०, १८१, १८३ आणि स.नं.१५५ नवीन स.नं.४० या जमिनी "इनाम जमिनी" असून त्यांची ऑनलाईन गा.न.नं.७/१२ सदरी भोगवटादार वर्ग-१ धारणाधिकार असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आले. त्यानंतर सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशान्वये सदरहू जमिनीच्या गा.न.नं.७/१२ ची

भोगवटादार सदरी वर्ग-२ नोंद घेण्यात आली आहे.
(३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.१८.०४.२०२२ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले होते. सदरहू पत्र मुद्देहिनाय छाननी करीता जिल्हाधिकारी यांना दि. १७.०५.२०२२ रोजी पाठविण्यात आले आहे.

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दि.३१.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये महसूली अधिकारी व प्राधिकारी यांनी गावाच्या "अधिकार अभिलेख" विषयक गा.न.नं.७ मधील हस्तलिखित ७/१२ वरुन धारणाधिकार सदरी असलेल्या नोंदीची (भोगवटा वर्ग-१/ वर्ग-२/सरकारी पट्टेदार इ.) खात्री करुन संगणकीकृत गा.न.नं.७ अद्ययावत करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

त्यानुषंगाने भोगवटा वर्ग-२ असलेल्या परंतू ऑनलाईन गा.न.नं.७/१२ च्या धारणाधिकार सदरी वर्ग-१ असलेल्या जमिनींची नोंदी फेरफार क्र.३३५६५ व ३३५५९ आधारे वर्ग-२ करण्यात आल्या. यानुषंगीक, प्राप्त आक्षेपांबाबत अर्धन्यायीक प्रकरणी सुनावणी घेवून तहसीलदार, अंबाजोगाई यांनी सदर जमिनीचा अधिकार अभिलेख विषयक गा.न.नं.७/१२ च्या धारणाधिकार सदरी वर्ग-२ ची नोंद निश्चित केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिंदळे (ता.भडगांव, जि.जळगांव) या गावाला लागून असलेल्या सात खळ्यांना आग लागल्याबाबत**

**(४) ४६७९३ (२७-१०-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिंदळे (ता.भडगांव, जि.जळगांव) या गावाला लागून असलेल्या सात खळ्यांना दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास दुपारी अचानक आग लागली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आगीत चारा, १५ बकऱ्या, १२ बोकड भस्मसात होऊन सुमारे १२ लाखांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नुकसानग्रस्तांना शासनाने कोणत्या प्रकारची मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२४-११-२०२३) :** (१) होय.
(२) होय, मौजे महिंदळे (ता. भडगांव, जि.जळगांव) येथे ७ शेतकऱ्यांचे गावठाण हद्दीतील खळवाडी परिसरात आग लागून सदर नुकसानीत १५ बकऱ्या, १२ बोकड, १ गाय व शेतीचे अवजारे गव्हाचे पोते, मक्का भरड पोते, शेडचे पत्रे, चौकटी, चारा कुट्टी, PUC पाईप, ज्वारी पोते, युरीया, केबल बंडल इ. नुकसान झालेले होते.
(३) त्यापैकी खालील पात्र लाभार्थी यांना पशुहानी बद्दल अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.
१. श्री. भगवान नाना पाटील, रा.महिंदळे - ८१,०००/- ( अक्षरी एक्याऐंशी हजार रु. मात्र) मदत वितरीत करण्यात आलेली आहे.
२. श्री. प्रशांत बापु पाटील, रा. महिंदळे - ३०,०००/- (अक्षरी तीस हजार रु. मात्र) मदत वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच शेतीचे अवजारे गव्हाचे पोते, मक्का भरड पोते, मक्का पोते, शेडचे पत्रे, चौकटी, चारा कुट्टी, PUC पाईप, ज्वारी पोते, युरीया, केवल बंडल इ. नुकसान झालेल्या लाभार्थ्यांना प्रचलित शासन निर्णयानुसार मदत देय नसल्याने अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील भामा आसखेड प्रकल्पाचे शेरे इतर हक्कात टाकण्याबाबत

**(५) ४६९१५ (१३-१२-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील १६ गावांमधील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर भामा आसखेड प्रकल्पाचे शेरे इतर हक्कात टाकण्याऐवजी "पुनर्वसन अधिनियमाच्या अनुषंगाने भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय" असा जाचक शेरा दाखल करण्यात आल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत व भविष्यातही अशा सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही अशा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनी हस्तांरणाच्या व्यवहारावरील असलेले निर्बंध उठविण्याची कार्यवाही करणेबाबत दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार भामा आसखेड प्रकल्पाचे शेरे उठविणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील जाचक शेरा पुर्णत: काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०९-११-२०२३) :** (१), (२) व (३) पाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी पर्यायी जमिन उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिन संपादन करण्याच्या अनुषंगाने भुधारकांच्या ७/१२ उताऱ्यावर पुनर्वसनासाठी राखीव शेरे नमुद करण्यात आलेले आहे. सदर शेऱ्यांमुळे भुधारकांना अनेक वर्षांपासुन जमिनींची खरेदी विक्री, खातेफोड आणि वारसा हक्कानुसार विभागणी करण्यास अडचणी येत होत्या. यास्तव राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रामध्ये जमिनींची आवश्यकता विचारात घेता, पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र भुधारकांच्या जमिनींना सिंचन सुविधा उपलब्ध नाही, अशा जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर अधिकारात नमुद पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे उठविणेबाबत महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०५.०८.२०१९ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली होती. सदर शासन निर्णय अधिक्रमीत करुन सिंचन सुविधा उपलब्ध नाही तसेच सिंचन सुविधा उपलब्ध आहे किंवा भविष्यात उपलब्ध होणार आहेत अशा दोन्ही प्रकारच्या जमिनींच्या हस्तांतरणावरील निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कामध्ये पुनर्वसनासाठी राखीव असलेले शेरे उठविणेबाबत दिनांक १८.०१.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दती विहीत केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे पुनर्वसनाचे राखीव शेरे उठविण्याबाबत कार्यपध्दती विहीत केली असली तरीदेखील हस्तंतारण व्यवहार करणे शक्य व्हावे तसेच शासनास सदर जमिन भविष्यात संपादन करणे शक्य व्हावे यानुषंगाने राज्य शासनाचा भुसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवुन फक्त शेती वापरासाठी हस्तांतरण व्यवहार अनुज्ञेय असा शेरा नमुद करणेबाबत दिनांक ११.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हाधिकारी पुणे कार्यालयामार्फत प्राप्त शेरे उठविणेबाबत झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ६९२.७४ चौ.कि.मी. क्षेत्राची नवीन १२ संवर्धन राखीव क्षेत्रे आणि ३ अभयारण्ये मंजूर करण्याबाबत

**(६) ४८२४८ (३१-१०-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६९२.७४ चौ.कि.मी. क्षेत्राची नवीन १२ संवर्धन राखीव क्षेत्रे आणि ३ अभयारण्ये मंजूर करण्यात आल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी १२ संवर्धन राखीव क्षेत्रे व ३ अभयारण्ये कोणत्या जिल्ह्यात मंजूर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संवर्धन राखीव क्षेत्र व अभयारण्ये कार्यान्वीत होण्याच्या अनुषंगाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०१-२०२४) :** (१), (२) व (३) राज्यातील धुळे, नाशिक, रायगड, पुणे, सातारा, कोल्हापूर आणि नागपूर या जिल्ह्यांतील ६९२.७४ चौ.कि.मी. क्षेत्रातील १२ संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यास आणि मुक्ताई भवानी, कोलामार्का संवर्धन राखीव व लोणार सरोवराच्या शेजारील क्षेत्र अभयारण्य म्हणुन अधिसूचित करण्यास राज्य वन्यजीव मंडळाच्या १८ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार सदर १२ संवर्धन क्षेत्रांच्या अधिसूचना निर्गमित करण्यात आल्या असून मुक्ताई भवानी, कोलामार्का संवर्धन राखीव व लोणार सरोवराच्या शेजारील क्षेत्र अभयारण्य म्हणुन अधिसूचित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सदर १२ संवर्धन राखीव क्षेत्रासाठी व्यवस्थापन समिती गठीत करणे आणि व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यात शासकीय कृषी महाविद्यालयाचा प्रस्ताव दाखल केल्याबाबत**

**(७) ४९४१६ (०४-११-२०२२). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यात शासकीय कृषी महाविद्यालय स्थापनेचा प्रस्ताव दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर शासकीय कृषी महाविद्यालय स्थापनेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत श्रीगोंदा येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनास शिफारस केलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उप जिल्हाधिकारी, बीड यांनी गौण खनिज करापोटी कपात केलेल्या रक्कमेबाबतची माहिती शासनास सादर केली नसल्याबाबत**

**(८) ५१३३७ (२९-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नियमबाह्य गौण खनिज करापोटी कपात केलेली रक्कम न दिल्यास कोर्टात जाण्याबाबत यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभाग (रोहयो) च्या दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी (रोहयो), बीड यांना माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका वर्षाचा कालावधी उलटूनही शासनाने मागितलेली माहिती सादर करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त माहिती सादर करण्यास केलेल्या विलंबाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत

आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी शासनाच्या दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांची पूर्तता करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर सुरु आहे. यानुषंगाने शासनाच्या दिनांक २५.३.२०२२ व १३.७.२०२३ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती तात्काळ सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांना देण्यात आल्या आहेत.
सदर प्रकरणाचा कालावधी साधारणत: २०-२१ वर्षापूर्वीचा असल्याने शासन पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती पूर्तता करण्यासाठी अभिलेखे उपलब्ध होण्यास अडचण येत आहे.

---

## गोंदिया जिल्हयात सिंचन विहीर योजनाचे लाभार्थी शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(९) ५१५६४ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयात सिंचन विहीर योजनेतंर्गत सन २०१९ मध्ये ११०० प्रकरणांना मंजूरी देण्यात आली परंतू आजही अनेक लाभार्थी शेतकरी अनुदानांच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदरील वंचित लाभार्थी शेतकऱ्यांना सिंचन विहीरीच्या बांधकामासाठी अनुदान त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) गोंदिया जिल्हयाकरिता ५०७.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. शासनाकडून सिंचन विहिरी करीता वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देण्यात येत असून उपलब्ध होणाऱ्या निधीतून लाभार्थी शेतकरी आपल्या विहिरीचे बांधकाम करीत असतात. सदर योजनेत लाभार्थ्यांने अगोदर काम केल्यानंतर मुल्यांकनानुसार लाभार्थ्यांना निधी वितरण करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेत मराठीचा पर्याय देण्यासाठी धोरण ठरविण्याबाबत

**(१०) ५३३३४ (२४-०१-२०२३). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेत मराठीचा पर्याय देण्यासाठी धोरण ठरवण्याबाबत, राज्य शासनाने पावले उचलावीत असे निर्देश मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे हे खरे आहे
(२) असल्यास, मराठी अभ्यासक्रमात पदवी प्राप्त करणाऱ्या मराठी भाषिक उमेदवारांना कसा न्याय मिळेल अशा दृष्टीने धोरण ठरविण्यासाठी पावले उचलावीत व त्याबाबत शासनाने शपथ पत्र दाखल करावे, असेही निर्देश दिले आहे हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेत मराठीचा पर्याय देण्याबाबत शासनाने कोणती धोरण अवलंबवली आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. धनंजय मुंडे (२८-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या ज्या विषयांच्या परीक्षा मराठी व इंग्रजी या दोन्ही माध्यमातून घेणे शक्य आहे त्या परीक्षांसाठी आयोगाने मराठी व इंग्रजी माध्यम लागू केलेलेच आहे. तथापि, ज्या विषयांचे अध्यापनाचे माध्यम इंग्रजी आहे व ज्याचे अध्ययन साहित्य इंग्रजीमध्ये उपलब्ध आहे त्या विषयांकरीता इंग्रजी भाषेतूनच पूर्व/मुख्य परीक्षा उमेदवारांना देणेबाबतचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथे रेशीम महाविद्यालयाला मंजुरी देण्याबाबत

**(११) ५३३९८ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी रेशीम शेती हा उद्योग करीत आहे, परंतु त्यासाठी आवश्यक ती महिती शेतकऱ्यांना मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे अंबाजोगाई येथील कृषी महाविद्यालयात रेशीम महाविद्यालयाला मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
शेतकऱ्यांना रेशीम शेतीबाबत येणाऱ्या अडचणींचे निराकरण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत रेशीम संशोधन योजनेच्या माध्यमातून, प्रक्षेत्र भेटी व मार्गदर्शनपर शिबीर आयोजन करुन करण्यात येते.
(२) हे खरे आहे.
(३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत केज, ता.अंबाजोगाई, जि.बीड येथे रेशीम महाविद्यालय स्थापन स्थापनकरणेबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनास शिफारस केलेली नाही. यासंदर्भात कृषि परिषदेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुरंदर (जि.पुणे) येथे सिताफळ व अंजीर या दर्जेदार रोपांची उपलब्धता होण्याबाबत

**(१२) ५४३४६ (२४-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) येथे सिताफळ व अंजीर या फळांची मोठ्या प्रमाणात लागवड करुन उत्पादन घेतले जाते, तथापि, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या दर्जेदार रोपांची उपलब्धता होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या संयुक्तपणे शेतकऱ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळण्यासाठी व सुधारित व संशोधित रोपांचा पुरवठा करण्यासाठी तालुका बीज गुणन प्रक्षेत्र जाधववाडीचे शासकीय फळ रोपवाटिकामध्ये रुपांतर करण्याबाबत कृषी संचालक यांच्याकडे प्रकल्प अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रस्तावाला अद्यापही मंजुरी मिळाली नसल्याने याबाबत उपाययोजना करुन सदर प्रस्तावाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०५-१२-२०२३) :** (१) अशत: खरे आहे.
(२) होय.
(३) तालुका बीज गुणन केंद्र, जाधववाडी ता.पुरंदर, जि.पुणे प्रक्षेत्राचे शासकीय फळरोपवाटिकेमध्ये रुपांतर करण्यास दि. २८/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवकुंड (जि.चंद्रपूर) येथील वनपरिक्षेत्रातंर्गत वाहनाच्या धडकेत वाढते वन्यश्वापदाचे मृत्यू रोखण्याबाबत**

**(१३) ५४८७५ (२५-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवकुंड (जि.चंद्रपूर) येथील बल्लारपूर वनपरिक्षेत्रांतर्गत चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावरील निर्मल धाब्यालगतच्या नाल्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत रात्रीच्या सुमारास बिबट्याचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात प्रामुख्याने चंद्रपूर जिल्ह्यातील बहुतांशी वनपरिक्षेत्रांतर्गत वाहनाच्या धडकेत वाढते वन्यश्वापदाचे मृत्यु रोखण्याबाबत व सी.सी.टीव्ही लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०१-२०२४) :** (१) चंद्रपूर वनवृत्तातील नियतक्षेत्र विसापूर अंतर्गत भिवकुंड नाल्याजवळील निर्मल धाब्याजवळ दिनांक २०.११.२०२२ रोजी अज्ञात वाहनाच्या घडकेने एक बिबट (मादी) अंदाजे वय ३ ते ४ वर्ष मृत्यु पावल्याची घटना निदर्शनास आली आहे.
(२) वाहनाच्या धडकेने होणारे वन्यप्राण्यांचे मृत्यु रोखण्यासाठी चंद्रपूर वन विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- बल्लारशाह वनपरिक्षेत्राअंतर्गत भिवकुंड (विसापुर) या परिसरात विभागामार्फत एकूण ४ सीसीटीव्ही व २८ ट्रॅप कॅमेरा लावण्यात आले असून त्याद्वारे बिबट व वाघ या वन्यप्राण्याच्या हालाचालींवर सनियंत्रण करण्यात येते.
- अपघात प्रवण क्षेत्रात वनकर्मचाऱ्यांच्या गस्तीचे प्रमाण वाढविण्यात आले आहे.
- आवश्यक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा वन्यप्राणी भ्रमणमार्ग दर्शविणारे सुचना फलक लवण्यात आले असून आवश्यकतेनुसार रस्त्यावर गतीरोधक लावण्यात आले आहे.
- वन्यप्राणी भ्रमणमार्ग असलेल्या क्षेत्रात (विशेषत: चिचपल्ली-मुल मार्गावर) वाहनांची गती कमी करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिवहन अधिकारी यांना विनंती करण्यात आली आहे.
- फिरते पथकामार्फत संवेदनशील भागात गस्त करण्यात येऊन रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाहनांवर पाळत ठेवली जाते.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## आंबेगव्हाण (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे बिबट सफारी स्थापन करण्याचा प्रस्ताव दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याबाबत

**(१४) ५६५२६ (२१-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर)** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगव्हाण (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे बिबट सफारी स्थापन करण्याचा प्रस्ताव दीर्घकाळापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने यासंदर्भातील अहवाल दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशी व त्यावरील कार्यवाहीची दिनांक १९ जानेवारी, २०२३ अखेरची सद्य:स्थिती व तपशील काय आहे तसेच याबाबत अंतिम निर्णय होऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यास सुमारे किती कालावधी लागणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०२३) :** (१) व (२) राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक २६.१०.२०१६ रोजी आयोजित बैठकीतील निर्णयानुसार जुन्नर वनविभागात बिबट सफारी स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्या अनुषंगाने सदर सफारीच्या निर्मितीसाठी स्थिळ निश्चित करण्याकरीता जुन्नर वन विभाग स्तरावर गठीत केलेल्या समितीने दिनांक ३१.०३.२०२२ रोजी त्यांचा अहवाल विभागीय कार्यालयात सादर केला आहे.

(३), (४) व (५) मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक १५.०९.२०२२ रोजी आयोजित बैठकीत प्राप्त निर्देशानुसार आंबेगव्हाण येथे बिबट सफारी निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या अनुषंगाने बिबट सफारी निर्मितीसाठी DPR तयार करणे व सल्लागार नियुक्ती करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी रु. १५०.०० लक्षच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार बिबट सफारी निर्मिती करण्याचा रु. ८०४३.२३ लक्ष रक्कमेचा DPR तयार करून केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या मंजूरीच्या अधिन राहून मा. मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

## राज्यातील लोक कलावंतांच्या मागण्यांवर निर्णय घेण्याबाबत

**(१५) ५६७२५ (१९-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोक कलावंतांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी दिनांक ११ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदानामध्ये उपोषण करुन आंदोलन केलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लोक कलावंतांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर मागण्यांवर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच अडचणींत सापडलेल्या लोककलावंतांच्या मागण्यांवर निर्णय घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०१-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे

(२) व (३) कलावंतांनी यादरम्यान ११ मागण्यांचे निवेदन या कार्यालयाकडे सादर केले. यात कोरोना अर्थसहाय्य ही प्रमुख मागणी होती. अन्य मागण्या विविध विभागाशी संबंधित होत्या.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रयोगात्मक कला प्रकारातील कलाकार व कलासमुह यांना अर्थसहाय्य करण्यास तसेच स्थानिक प्रयोगात्मक कलेतील कलाकारांच्या व संस्थांच्या निवडीशी संबंधित प्रशासकीय खर्चास दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर अर्थसहाय्य करण्याबाबतच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अटी व शर्तीमध्ये शिथिलता तसेच अंमलबजावणीची कालमर्यादा दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत वाढविण्यास दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता देण्यात आली होती.

तसेच राज्यातील प्रयोगात्मक कलाप्रकारातील १०५ कला समुह व संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२२ च्या शासन निर्णयान्वये, ३२० कला समूह व संस्थांना दिनांक २८ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये व १०८ कला समूह व संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये कोरोना पार्श्वभूमीवर अर्थसहाय्य वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील चाकण, खेड व मंचर वन परिक्षेत्र व लगतच्या ग्रामीण परिसरात नागरवस्तीतील बिबट्यांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(१६) ६०७४६ (२१-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील चाकण, खेड व मंचर वन परिक्षेत्र व लगतच्या ग्रामीण नागरी वस्त्यांमध्ये बिबट्यांचा वाढत्या प्रमाणात वावर आढळून आल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ व जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वन खात्याकडे अशा प्रकारच्या किती प्रकरणांची नोंद करण्यात आली आहे तसेच नोंदणीकृत प्रकरणामध्ये दिनांक १ ते ३१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या नुकसानीचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, या प्रकरणातील नुकसानग्रस्तांना शासनाच्यावतीने कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत नागरवस्त्यांमधील वन्य प्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांच्या जिविताला होणारा संभाव्य धोका टाळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०२३) :** (१) जुन्नर वनविभागाचे बहुतांश क्षेत्र डोंगराळ असून यामध्ये मोठया प्रमाणात पाटबंधारे विभागाचे सिंचन प्रकल्प आहेत. जुन्नर वनविभागात प्रामुख्याने बारमाही पिकाचे क्षेत्र जास्त असल्यामुळे तसेच सहज मिळणारे भक्ष्य त्यामुळे बिबट्याने सदर क्षेत्रात अधिवास निर्माण केला आहे.

(२) व (३) चाकण, खेड व मंचर येथे माहे जानेवारी, २०२३ मध्ये मनुष्य जखमी/मृत्युच्या ३, पशु जखमी/मृत्युच्या ६१ घटना निदर्शनास आल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितास अनुक्रमे रु. २२.५० लक्ष व रु. ७.०७ लक्ष आर्थिक नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) मानव बिबट संघर्ष असलेल्या गावांमध्ये वनकर्मचाऱ्यांमार्फत गस्त करणे, स्थानिकांचे प्रबोधन करणे, बचाव पथकांची निर्मिती करणे अशा प्रकारच्या विविध उपाययोजना क्षेत्रिय स्तरावर करण्यात येतात.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील रिक्त पदाबाबत**

**(१७) ६४६८१ (२५-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयात एकूण १५ मंजूर पदांपैकी १० पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या झालेल्या बदल्या व बदली झालेल्या कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागेवर नव्याने होत नसलेल्या नियुक्तीमुळे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त तालुक्यातील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती
कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख श्रीवर्धन कार्यालयातील मंजुर १७ पदांपैकी १२ पदे रिक्त होती.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

शासनाकडून पदभरतीवर निर्बंध असल्यामुळे भूमि अभिलेख विभागात सन २०१४ नंतर पदभरती झालेली नव्हती. तसेच गट-ड संवर्गातील पदभरतीवर अद्याप निर्बंध असल्यामुळे संपूर्ण विभागात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत.

तथापि, विभागातील गट-क (पदसमुह ४) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यास्तव पदभरती प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्यानुसार उपसंचालक भूमि अभिलेख, मुंबई यांचेकडील दि.३०.०६.२०२३ रोजीच्या आदेशान्वये कोकण विभागात एकूण २१७ उमेदवारांना नियुक्ती देण्याचे आदेश पारीत करण्यात आलेले असून त्यामध्ये उप अधीक्षक भूमि अभिलेख, श्रीवर्धन कार्यालयात एकूण ३ नविन कर्मचारी गट-क पदसमुह ४ संवर्गात नियुक्त करण्यात आलेले आहेत. सदरचे कर्मचारी माहे जुलै २०२३ मध्ये हजर झालेले आहेत. तसेच गट-क पदसमूह ३ संवर्गातील निमतानदार क्र.१ या पदावर माहे जुलै २०२३ मध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली असून सदर कर्मचारीदेखील हजर झालेला आहे.

सद्यस्थितीत उप अधीक्षक भूमि अभिलेख, श्रीवर्धन कार्यालयाकडे सर्व प्रकारची मिळून एकूण १७२ मोजणी प्रकरणे शिल्लक असून सदर कार्यालयाकडे दरमहा सरासरी ३० प्रकरणे आवक होत असतात. सरासरी आवक प्रकरणांची संख्या पहाता गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक) संवर्गातील पुरेसे कर्मचारी आता कार्यालयाकडे उपलब्ध असून त्या कर्मचाऱ्यांकडून सर्व प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याकामी नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात वन जमिनींची विनापरवाना विक्री केल्याबाबत**

**(१८) ६४७०३ (२७-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील वन जमिनींच्या विनापरवाना विक्रीच्या प्रकरणांची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी तसेच मा.वने मंत्री व मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तूत प्रकरणी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक यांच्या स्तरावरुन विभागीय वन अधिकारी (दक्षता), नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीची नियुक्ती करण्यात आली.

मे.टि.पी.सौर्या लि. यांच्याव्दारे करण्यात आलेल्या वनेत्तर कामाच्या अनुषंगाने सदर कंपनी विरुद्ध वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (JMFC) यांच्या न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

प्रकरणी वन विभागाने केलेल्या कारवाईच्या विरुद्ध मे.टि.पी.सौर्या लि. यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

---

**वाघोलीबुटी (व्याहाळ खुर्द, जि.चंद्रपूर) येथे वाघ हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(१९) ६४७५५ (२७-०८-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघोलीबुटी (व्याहाळ खुर्द, जि.चंद्रपूर) येथे शेतावर कामासाठी गेलेल्या एका महिलेवर (श्रीमती प्रमिला रोहणकर) वाघाने हल्ला करुन ठार केल्याचे दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले तसेच उक्त गावातील महिला ममताबाई बोधलकर यांचाही वाघ हल्ल्यात मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरात वाघ व अन्य हिंस्त्र प्राणी यांचा वावर वाढल्यामुळे, वाघांचा बंदोबस्त करण्याची मागणी गावकऱ्यांनी स्थानिक प्रशासन व वन विभागाकडे केली असतानाही त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मृतांच्या वारसांना शासकीय धोरणानुसार आर्थिक मदत व वाघांचा बंदोबस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०१-२०२४) :** (१) चंद्रपूर वनविभागातील सावली परिक्षेत्रांतर्गत वाघाच्या हल्ल्यात श्रीमती प्रेमिला रोहणकर व ममताबाई बोधलकर यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार वाघाच्या हल्ल्यात मृत झालेल्या श्रीमती प्रेमिला रोहणकर व ममताबाई बोधलकर यांचे कायदेशीर वारसास प्रत्येकी रु. २०.०० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे. तसेच विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

- दिनांक २७.०५.२०२३ रोजी सदर परिसरात वावरत असलेल्या वाघाला जेरबंद करण्यात आले आहे.
- मनुष्य हानीची घटना होवू नये या करीता क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत गस्त करण्यात आली.
- कॅमेरा ट्रॅप लावून वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(२०) ६५०९१ (२४-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत वारंवार आश्वासने देऊनही आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धनगर आरक्षणाबाबत अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या "टीस" या संस्थेने शासनाला अहवाल सादर केला असून एकमताने धनगर आरक्षणाची शिफारस केली असताना आरक्षणाबाबत निर्णय झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरक्षणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१०-०१-२०२४) :** (१), (२) व (३) धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांना दिनांक २२.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये धनगर व धनगड जमातींचा संशोधन/सर्व्हेक्षण करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवाल पुढील निर्णयास्तव वरिष्ठ पातळीवर सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरीआगर (ता.गुहागर जि. रत्नागिरी) येथील प्रलंबित असलेल्या मच्छीमार जेटीच्या निविदा प्रक्रियेस विलंब होत असल्याबाबत**

**(२१) ६५२१९ (२४-०८-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखरीआगर (ता.गुहागर, जि. रत्नागिरी) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २० जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये विभागाच्या अखत्यारितील राज्यस्तरीय योजनांतर्गतच्या कामांना स्थगिती देण्यात आली होती उक्त स्थगिती दिलेल्या कामांमध्ये येथील मच्छीमार जेटीच्या रू. ८.४३ कोटी रक्कमेच्या कामाना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्याचा समावेश होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामावरील स्थगिती दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये उठविण्यात आली असून सद्यस्थितीत उपरोक्त कामाची निविदाप्रक्रिया सुरू असून ती पूर्ण होताच कामाला सुरूवात होईल, असे लेखी उत्तर मत्स्यव्यवसाय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०१-२०२४) :**(१) हे खरे आहे.

साखरी आगार येथे मच्छिमारांसाठी सुविधा पुरविणे या कामास दिनांक १५/१२/२०११ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. परंतु MCZMA पर्यावरण विभागाची परवानगी नसल्याने सदर काम बंद होते.
(२) हे खरे आहे.

सदर कामाकरिता नव्याने MCZMA च्या १४६ व्या व SEIAA च्या २१० व्या बैठकीमध्ये पर्यावरण विभागाच्या परवानग्या प्राप्त झाल्या आहेत. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन शासन निर्णय दिनांक २४/०५/२०२३ अन्वये रू.८.४३ कोटी इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) सदरच्या कामाबाबत निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कंत्राटदारास दिनांक १७/०७/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला असून पावसाळयामुळे काम सुरू करता आले नाही. सद्य:स्थितीत काम सुरू करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: रायगड जिल्हयातील बहुतांशी आदिवासी बांधवांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ अद्यापही मिळत नसल्याबाबत**

**(२२) ६५२७२ (०३-०९-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: रायगड जिल्हयातील बहुतांशी आदिवासी बांधवांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळाला नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या विविध योजनांचा १०० टक्के लाभ मिळत नसल्यामुळे आदिवासी बांधवांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी स्थलांतरण करावे लागत असून मुला मुलींना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आदिवासी बांधवांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०३-०१-२०२४) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे. रायगड जिल्हयातील आदिवासींमध्ये कातकरी समाजाचे प्रमाण जास्त आहे. सदर कातकरी जमातीतील लोक हे कर्नाटक, तेलंगणा व आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये कोळसा भट्टीवर रोजगारानिमित्त स्थलांतरीत होतात. तथापि, आदिवासी उपयोजनेंतर्गत योजनाचा लाभ कातकरी समाजास दिला जात असल्याने स्थलांतरणाचे प्रमाण कमी झालेले आहे. तसेच स्थलांतरीत पालकांची मुले ही निवासी शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, नामांकित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतीगृहांमध्ये निवास व्यवस्थेसह शिक्षण घेत आहेत.

आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी समाजासाठी विविध वैयक्तिक व सामूहिक गटाच्या योजनांचे लाभ दिल्याने स्थलांतरणाचे प्रमाण कमी झालेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे करण्याबाबत**

**(२३) ६५३५४ (२४-०८-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी खचलेल्या व बुजल्याबाबत तक्रारी शासनाकडे व लोकप्रतिनिधी यांच्याकडे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे घेण्याबाबत दिनांक २० जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास विहिरींच्या दुरुस्तीची कामे करण्यात यावी असा शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१४/प्र.क्र.२५/मग्रारो-१, दिनांक २०/०७/२०१५ अन्वये जिल्हयामध्ये

अतिवृष्टी किंवा पूरपरिस्थिती निर्माण झाल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी घोषित करून लाभधारकांची यादी प्रसिध्द केल्यानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे करण्याचे अनुज्ञेय करण्यात आले होते.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही योजना केंद्र पुरस्कृत योजना असून, केंद्र शासनाने दिनांक १२.०६.२०२१ च्या पत्रान्वये "Repair & maintenance of individual asset(s), in any case, is not permissible under Mahatma Gandhi NREGA" अशा सूचना दिलेल्या होत्या. खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरीच्या दुरुस्तीची कामाच्या उपयोगितेच्या अनुषंगाने दुरुस्तीची कामे घेण्यास परवानगी देण्याबाबत दिनांक २०/१२/२०२१ चे पत्र आणि दिनांक २६/०७/२०२२, दिनांक २३/११/२०२२ व दिनांक १०/०७/२०२३ च्या स्मरणपत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. तथापि, सदर प्रस्तावास केंद्र शासनाची अद्यापपर्यंत मान्यता प्रदान झालेली नाही.

(४) विलंब झालेला नाही.

---

## पुणे येथे कृषी आयुक्तालयाने कारवाईची नस्ती प्रलंबित ठेवल्याबाबत

**(२४) ६५४३९ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे राज्य शासनाच्या कृषी विभागाने फौजदारी कारवाईचे आदेश देवूनही वैरण विकास कार्यक्रमात झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी कृषी आयुक्तालयाने कारवाईची नस्ती प्रलंबित ठेवण्याचा दिनांक १२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने विलंब करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२४-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी काही मुद्द्यांचा खुलासा करण्याबाबत शासनाने कृषि आयुक्तालयास कळविले असता, कृषि आयुक्तालयामार्फत चारा पैदासकार, चारा पिके संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर व विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर यांच्याकडून अहवाल घेण्यात आला आहे. सदर प्रकरणी गुणवत्तेवर आधारीत अभिप्राय देण्यासाठी अधिक सखोल तपासणीची आवश्यकता दिसून आल्याने दि.०७.०८.२०२३ रोजी आयुक्त(कृषि) यांच्याकडे एकत्रित सुनावणी घेण्यात आली आहे. सदर सुनावणी दरम्यान चारा पैदासकार, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी दिलेल्या लेखी अभिप्रायानुसार प्रस्तुत प्रकरणी योजना योग्य पध्दतीने राबविल्याचे स्पष्ट होत असून कोणताही गैरव्यवहार/अनियमितता झालेली दिसून येत नाही. त्यामुळे कोणतीही शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची आवश्यकता नसल्याचे आयुक्त(कृषि) यांनी दि.०६.१०.२०२३ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सहाय्यक निबंधक कार्यालयातील रिक्त पदांबाबत

**(२५) ६५४५१ (२४-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील सहकारी संस्थावर नियंत्रण ठेवून योग्य मार्गदर्शन करणाऱ्या सहाय्यक निबंधक कार्यालयातील सहाय्यक निबंधकासह चार पदे मागील अनेक दिवसापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात ३५० सहकारी संस्था असून या सहाय्यक निबंधक कार्यालयातील एकाच अधिकाऱ्यावर त्यांचे कार्यालयीन काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सदर रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०१-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कुडाळ, जि.सिंधुदूर्ग या कार्यालयात एकूण ५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सहाय्यक निबंधक व सहकार अधिकारी श्रेणी-२ ही २ पदे भरलेली असून सहाय्यक सहकार अधिकारी, कनिष्ठ लिपीक व शिपाई ही पदे रिक्त आहेत.

सद्यस्थितीत तालुक्यामध्ये ३४३ नोंदणीकृत सहकारी संस्था असून उपरोक्त कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांमार्फत या सहकारी संस्थांच्या कामकाजाचे नियमन करण्यात येत आहे.
(३) सहकार आयुक्त कार्यालय, पुणे व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कोकण विभागातील गट-क संवर्गातील सरळसेवा कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोंडवाडी (ता.धारणी, जि.अमरावती) येथील आदिवासी अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहीर खोदण्यासाठी कर्ज पुरवठा करण्याबाबत

**(२६) ६५६३३ (२८-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंडवाडी (ता.धारणी, जि.अमरावती) येथील आदिवासी अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या कुटूंबांनी सन २०१९ मध्ये शेतात विहिरीच्या खोलीकरणासाठी खर्च केलेली रक्कम शासनाकडून अद्यापपर्यंत मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक ग्रामपंचायतीमार्फत सदर खर्च करणे आवश्यक असताना आदिवासींना स्वखर्चाने विहिरीचे खोलीकरण करावे लागले त्यामुळे आदिवासी अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या कुटूंबांचे नुकसान झाल्याचे दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०१९ या वर्षात कोंडवाडी ग्रामपंचायत, ता. धारणी मध्ये एकुण तीन सिंचन विहीरी होत्या. त्यातील दोन खचलेल्या विहीरी व एक नविन सिंचन विहीर होती. तिन्ही विहीरीचे खोदकाम पुर्ण होऊन मोजमापानुसार लाभार्थ्यांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायतीमधून पंचायत समिती किंवा तहसील कार्यालय येथे विहीर खोदकामासाठी खर्च केलेली रक्कम मिळाली नाही, अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच ग्रामपंचायतीमधील कोणत्याही लाभार्थ्यांचे सिंचन विहीरी खोदकामाचे कुशल देयके प्रलंबित नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

## ताडोबा (जि.चंद्रपूर) पळसगाव क्षेत्रात व्याघ्र प्रकल्पाच्या रात्रीच्या सफारीत अवैध मोफत सफारी केल्याबाबत

**(२७) ६५६५७ (२८-०८-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती**

**मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा (जि.चंद्रपूर) येथे व्याघ्र प्रकल्पाच्या रात्रीच्या सफारीत दिनांक १८ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास सायंकाळी ७.३५ वाजता एका जिप्सी चालक-मालकाने ऑनलाईन वा स्पॉट बुकिंग न करता वा शुल्क न भरता पळसगाव क्षेत्रात अवैध मोफत सफारी केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वनकुटीवर उपस्थित वन मजुरांनी जिप्सी जंगलात गेल्याची व परत आल्याची आवक-जावक रजिस्टरवर नोंद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जिप्सी चालक-मालकावर तसेच वनधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी संबंधित जिप्सी चालक-मालक यांना दिनांक ०८.०४.२०२३ पासून एक महिन्याकरता निलंबित करुन त्यांच्याकडून प्रवेश शुल्काची रक्कम रुपये ४०००/- दंड म्हणून वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात केळी उत्पादक शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेतून मजूरी खर्च देण्याबाबत**

**(२८) ६६१८५ (२४-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केळी उत्पादक शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मजूरी देण्याचे शासनाने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना सुरु झाल्यास मजूरी खर्चावर होणारा खर्च कमी होवून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-११-२०२३) :** (१) विभागाच्या दिनांक ३० मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये केळी या पिकाचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड या कार्यक्रमामध्ये नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. तसेच विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ३ वर्षासाठी असणा-या केळी या पिकास आर्थिक मापदंडास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार महात्मा गांधी रोजगार हमी येजनेंतर्गत पात्र शेतक-यांना फळबाग लागवड कार्यक्रमामध्ये केळी पिकाची नवीन लागवड करण्यासाठी रु.१,७६,९०४/- मजूरी व रु.८७,१४४/- सामुग्री अशी प्रती हेक्टरी एकूण रक्कम रु.२,६४,०४८/- इतकी रक्कम तीन वर्षात देय आहे.

(२) हे, खरे नाही.

(३) मनरेगा अंतर्गत लाभार्थ्यांच्या मागणीनुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्नलवाडी (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे वणव्यामुळे दोन एकर डांळिब बाग जळाली असल्याबाबत**

**(२९) ६६३१० (२७-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) येथे वणवा लागण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून कर्नलवाडी येथील माळरानाला दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी लागलेल्या आगीत एका शेतकऱ्यांची दोन एकर क्षेत्रातील ६३० डाळिंबाची झाडे जळून गेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या डाळिंब शेतीसाठी शेतामध्ये अंथरण्यात आलेल्या ड्रिपचे पाईप देखील जळून दुहेरी नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तात्काळ पंचनामे करुन या शेतकऱ्याला तातडीने आर्थिक मदत देण्यासह येथे वारंवार लागणारे वणवे नियंत्रणात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२२-११-२०२३) :**(१) होय हे अंशत: खरे आहे. प्रत्यक्ष घटना दिनांक ३ मे २०२३ रोजी असून अज्ञात व्यक्तीने गवत पेटविलेमुळे आग लागून नुकसान झालेले आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) या प्रकरणी दि. ०४ में २०२३ रोजी गाव कामगार तलाठी व कृषि सहाय्यक कर्नलवाडी यांनी संयुक्त पंचनामा केलेला आहे. परंतु महसुल व वन विभाग, यांचकडील शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि. २७/०३/२०२३ नुसार सदर नुकसानीकरिता तरतुद नमुद नसल्याने तहसिलदार पुरंदर यांचेकडुन मदत देण्यात आलेली नाही. तसेच वांरवार लागणारे वणवे नियंत्रणात आणण्याबाबत योग्य त्या उपाय योजना करणेबाबत तहसिलदार पुरंदर यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, वन विभाग, सासवड यांना सूचित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील वन्यप्राण्यांनी केलेल्या शेत पिकांची नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(३०) ६६८१२ (२९-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात वन्य प्राण्यांकडून पिके खाण्याचे प्रकार वाढत असून वन विभागाकडून गुंठाभर क्षेत्रासाठी २०० रुपये मदत शेतकऱ्यांना मिळत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसान भरपाईच्या रक्कमेत ऑनलाईन अर्ज प्रक्रियाही शेतकऱ्यांना परवडत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०१-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्ह्यात वन्य प्राण्यांमुळे शेतपीक नुकसान झाल्याच्या २०२२-२३ दरम्यान ९५५१ घटना निदर्शनास आल्या असून त्यामध्ये रु. ६४४.८६ लक्ष इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून अदा करण्यात आली आहे.

शेतपीक नुकसानीच्या प्रकरणांमध्ये शासन निर्णय दिनांक ०९.०७.२०१५ नुसार नमूद त्रीसदस्यीय समितीमधील वनरक्षक, कृषी सहाय्यक, तलाठी हे घटनास्थळी जाऊन नुकसान झालेल्या शेत पिकाची पाहणी करुन पंचनामा करण्याची

कार्यपध्दती आहे. सदर त्रीसदस्य समिती नुकसानीचे मोजमाप करुन मूल्य निश्चित करते व त्यानुसार नुकसान भरपाई अदा करण्यात येते. याकरीता वनविभागाच्या संकेतस्थळावर शेतपिक नुकसान भरपाई करिता ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यासाठी विभागाकडून कोणतेही मुल्य आकारण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### घाट बोरी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) वनपरिक्षेत्रांतर्गत होत असलेल्या अवैध वृक्षतोडीबाबत

**(३१) ६६८१५ (२८-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाट बोरी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) वनपरिक्षेत्रांतर्गत येत असलेल्या डोणगांव, देऊळगाव साकर्षा, लोणी गवळी, भोसा, दुर्गपुरी भिवापूर, परिसरात मागील काही दिवसांपासून अवैध वृक्षतोड सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वृक्षतोडीकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०१-२०२४) :** (१) घाटबोरी (ता. मेहकर, जि. बुलढाणा) वनपरिक्षेत्रांतर्गत येत असलेल्या डोणगांव,देऊळगांव साकर्शा, लोणी गवळी,दुर्गपुरी, भिवापूर, परिसरातील वनक्षेत्रात माहे एप्रिल,२०२३ ते जुन २०२३ दरम्यान ०६ वनगुन्हे नोंदविले असुन त्यामध्ये १९ साग थुटे व १८ सागोत्तर वृक्षांची तोड झालेली निदर्शनास आले.
(२) अवैध वृक्षतोडीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने वन विभागामार्फत नियमितपणे गस्तीचे आयोजन, बीट निरिक्षण व संबधित क्षेत्रीय कर्मचारी मार्फत वनसंरक्षणाची कामे पार पाडली जातात व वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा घेण्यात येतो. त्यामुळे वृक्षतोडीबाबत वनविभागाचे दुर्लक्ष झाले नाही.
(३) घाटबोरी (डोणगांव, देऊळगांव साकर्शा, लोणी गवळी,दुर्गपुरी, भिवापूर) या वनपरिक्षेत्रातील वृक्षतोडी व्यतिरिक्त घाटबोरी वन परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या गावातील खाजगी मालकीचे गट क्र. ५०६ भोगवटादार वर्ग-१ व गट क्र.५०३,५०४, ५०५ भागेवटदार वर्ग-२ मध्ये मालकी क्षेत्रातील परवानगी दिल्यापेक्षा ५६६ जास्त सागवान वृक्ष अवैध तोडल्याचे निदर्शनास आल्याने मालकी क्षेत्रातील सखोल चौकशी करिता मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती या कार्यालयामार्फत विभागीय वन अधिकारी (दक्षता), अमरावती यांचे अध्यक्षतेखाली समिती व सहायक वन संरक्षक (रोहयो व वन्यजीव) मेहकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती अशा दोन वेगवेगळया समीत्या गठीत करण्यात आलेल्या होत्या. सदर दोन समीत्यांच्या चौकशी अहवालावरुन वनरक्षक घाटबोरी-२ यांना शासकीय कामात हलगर्जीपणा केल्या प्रकरणी निलंबित करण्यात आले आहे. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) घाटबोरी यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित केली असुन वनपाल घाटबोरी यांना दोषारोपत्र बजावण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिंतूर (जि.परभणी) येथे दररोज मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड सुरु असल्याबाबत

**(३२) ६६८४९ (२८-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.परभणी) येथे दररोज मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड सुरु असून त्याकडे वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील चार ते पाच वर्षापासून वृक्ष तोड करणारी टोळी दररोज १०० पेक्षा जास्त झाडांची कत्तल करीत असल्याची तक्रार झाड फाऊंडेशन, जिंतूर यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे करुन अवैध वृक्षतोड व त्याकडे दुर्लक्ष

करणाऱ्या वन विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी वारंवार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने वन विभागाच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०१-२०२४) :** (१) जिंतुर जि. परभणी येथे मोठया प्रमाणात अवैध वृक्षतोड होत नसुन त्याकडे वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले नाही.

तथापि, जिंतुर जिल्हा परभणी येथे मागील ५ वर्षात अवैध, वृक्षतोड थुटांची संख्या एकुण ८१ आढळुन आली आहे.त्यावर वनविभागामार्फत एकुण १५ वन गुन्हे जारी करण्यात आलेले आहेत. गोपनिय संदेशानुसार वेळोवेळी धाडी टाकुन वनसरंक्षणाचे काम पार पाडले जाते. तसेच वननियमानुसार अवैध वृक्षतोडीबाबत उपाय योजना केल्या जातात.
(२) झाडांची कत्तल करित असल्याबाबतची झाड फाऊंडेशन, जिंतुर यांचे तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरीनाटे (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथे मत्स्य व्यवसाय विकास बंदराच्या उभारणीबाबत**

**(३३) ६६९३३ (२४-०८-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखरीनाटे( ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथे मोठ्या प्रमाणावर मत्स्य व्यवसाय होत असून सध्या या बंदरात जवळपास ५०० हून अधिक मच्छीमारी बोटी उभ्या असतानाही, आत्तापर्यत सुसज्ज बंदर नसल्यामुळे मागील अनेक वर्षांपासून तेथील मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांनी सुसज्ज मत्स्य व्यवसाय बंदर उभारण्यात यावे अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी मच्छीमार संघटनाच्या पदाधिकांऱ्यानी दिनांक १५ एप्रिल २०२३ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील सहयाद्री अतिथिगृहामध्ये मत्स्य व्यवसाय मंत्री महाराष्ट्र राज्य यांची भेट घेऊन त्यांना पुन्हा निवेदन सादर केले असता मत्स्य व्यवसाय मंत्र्यांनी बंदर उभारणीसाठी १४६ कोटी अंदाजित खर्चाच्या निधी संदर्भात घोषणा करून केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या एकत्रित निधीच्या माध्यमातून या प्रकल्पाचे त्यांना आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी मत्स्य व्यवसाय विकास बंदराच्या उभारण्याच्या आराखड्यात बंदरात आलेल्या बोटी नियोजन बद्ध रितीने टर्मिनल, मासळी दीर्घकाळ टिकावी यासाठी आईस फॅक्टरी, उपहारगृहे सार्वजनिक स्वच्छता गृहाच्या माशाच्या लिलावासाठी हॉल या आणि अशा स्वरूपाच्या अनेक गोष्टीनी सुसज्ज असे मत्स्य व्यवसाय बंदर साखरीनाटे येथे उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी सुसज्ज मत्स्य व्यवसाय विकास बंदराच्या कामास शासनाने मंजुरी दिली आहे काय, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०१-२०२४) :**(१) होय.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

साखरीनाटे येथील प्रस्तावित मत्स्यबंदराच्या आराखडयात माशांच्या लिलावासाठी हॉल, उपहारगृह, सार्वजनिक स्वच्छतागृह, जाळी विणण्याचे शेड, प्रशासकीय इमारत, बोट दुरूस्ती शेड इ. बाबींचा समावेश आहे.
(४) साखरीनाटे, ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथे मत्स्यव्यवसाय विकास बंदराच्या कामास केंद्र शासनाने दिनांक २२/०८/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच राज्य शासनाने दिनांक ६/०६/२०२३ अन्वये प्रशासकीय

मान्यता प्रदान केलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेमार्फत सदर काम मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास निधी योजना (FIDF) अंतर्गत कार्यान्वित करण्यात येत आहे.

सदरच्या प्रकल्पाकरिता नाबार्डने दिनांक २४/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये रू.१४६.९० कोटी इतक्या रक्कमेचे कर्ज मंजूर केले आहे. सदर कामासाठी प्रकल्प नियोजन सल्लागार नेमण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तांत्रिक मान्यता व पर्यावरण विषयक दाखले प्राप्त झाल्यानंतर कामाची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली येथे सेंद्रीय शेती मॉल सुरु करण्याबाबत

**(३४) ६६९६७ (२५-०८-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथे जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाच्या माध्यमातून शासनाने सेंद्रीय शेती मॉल उभारला असून त्याचे उद्धाटन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मागील पाच वर्षांपासून हा मॉल सुरु न झाल्यामुळे सेंद्रीय शेती करण्याचा शेतकऱ्यांसाठी मॉल दिखावा ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२०-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक ०१ एप्रिल, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेनुसार दिनांक ०१ जानेवारी, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ या एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रति माह २०,००० रु. प्रमाणे अॅग्रीनफ्रेश शेतकरी उत्पादक कंपनी मर्यादित. बुधगाव, ता.मिरज यांना चालविण्यास देण्यात आलेली होती. सदर अॅग्रीमॉल भाड्याची एक वर्षाची मुदत दिनांक ३१.१२.२०२२ रोजी संपली आहे.

अॅग्रीमॉल मधील काही कामे अपूर्ण अवस्थेत असून सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांचेकडून सदर कामे पूर्ण करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर मॉलची काही कामे अपूर्ण अवस्थेत असल्याने अॅग्रीमॉल भाड्याने देण्याचे काम तुर्त थांबवलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माझगाव डॉक (मुंबई) येथे सावकारी कर्जाच्या वसुलीसाठी एका व्यक्तीस केलेली मारहाण

**(३५) ६७०७० (११-०९-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागाप्रमाणे मुंबईतही सावकाराकडून जाच सुरु असून सावकारी कर्जाच्या वसुलीसाठी सावकाराच्या मुलाने साथीदाराच्या मदतीने पालिका कर्मचाऱ्यास मारहाण केल्याची घटना माझगाव येथे घडल्याचे दिनांक १ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच माझगाव डॉक परिसरात एका कर्मचाऱ्यास नेवून सावकाराच्या मुलांनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मारहाण केल्याने सदर व्ही.पी.रोड. पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी गरजूंना जास्त व्याजाने पैसे देवून वसुलीसाठी वेठीस धरणाऱ्या या सावकाराबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा यावर आळा बसण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-११-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मुंबई महानगरपालीकेतील सी-विभाग कार्यालयातील कर्मचारी श्री. राजेंद्र खेल्या नागोटकर यांनी श्री. प्रविण शिवराम पवार यांचेमार्फत परवानाधारक सावकार श्री. जगदीश गोविंद भादरका व त्यांचा मुलगा यांचे विरुद्ध सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ई- विभाग, मुंबई यांचे कार्यालयात दि.२५/११/२०२१ रोजी बेकायदेशीर कर्ज वसुलीकरीता अपहरण करून केलेल्या मारहाणीबाबत तक्रार केली होती.

तद्नंतर श्री. नागोटकर यांनी व्ही. पी. रोड पोलीस ठाणे, मुंबई येथे दि. २६/१२/२०२१ रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

(३) संबंधित सावकाराविरुद्ध प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर यांनी दि.३१.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये, श्री. जगदीश भादरका यांचा सावकारी परवाना रद्द केलेला आहे. संबंधित सावकाराविरुद्ध गु. र. क्र. ८४०/२०२१ दाखल करण्यात आला असून पुढील तपास संबधित पोलीस अधिकाऱ्यांकडुन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपुर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्लास्टिक मुक्त करण्याबाबत**

**(३६) ६७२१२ (२५-०८-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात येणारे पर्यटक पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटल्या जंगलातच फेकत असल्याने वाघांना धोका निर्माण झाल्याची दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्लास्टिक मुक्त जंगल सफारीकडे लक्ष देणे गरजेचे असून सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीनुसार वन्यप्राण्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये याकरिता शासनाने काही नियम केले आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प हे कचरामुक्त क्षेत्र असून पर्यटकांना जंगलात किंवा सफारीच्या वेळी प्लॅस्टिक नेण्याची परवानगी देण्यात येत नाही. तसेच कोणतेही खाद्यपदार्थ वन्यप्राण्यांना देण्यास सक्त मनाई करण्यात येते. पर्यटन वाहनांमध्ये एक कचरा पिशवी ठेवून त्यांचा सर्व कचरा त्याच पिशवीत जमा करण्याच्या सूचना देण्यात येतात. जर पर्यटक कचरा इतरत्र टाकताना आढळल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**पुणे शहरात सावकाऱ्यांचा खंडणीचा व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(३७) ६७४१३ (२९-०८-२०२३).श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात कर्जदारांकडून मोठ्या दराने व्याज आकारणे, मुद्दल, दंडव्याजाची रक्कम वसूल करणे, मारहाण, अपहरण, जिवे मारण्याची धमकी असा बेकायदा सावकाऱ्यांचा खंडणीचा व्यवसाय सुरु असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे कर्जदार आणि जामिनदारांना मोठा मानसिक त्रास आणि पिळवणूक होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

दि. १०.०४.२०२३ रोजी दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात पुण्यात बेकायदा सावकारांची दहशत या मथळयाखाली बातमी प्रसिद्ध झालेली आहे.

त्यानुषंगाने नाना कुदळे, गणेश उर्फ मंगेश दिगे यांच्यावर दि. ०४/०४/२०२३ रोजी अक्षय शिरोळे व सुरज थोपटे यांच्यावर दि. ०६/०४/२०२३ रोजी, विशाल धोत्रे यांच्यावर दि. ०७/०४/२०२३ रोजी, ह्या पाचही विना परवाना सावकारांवर अनुक्रमे कोथरुड, वारजे आणि विश्रांतवाडी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक करण्यात आली होती.
त्यापैकी नाना कुदळे, गणेश उर्फ मंगेश दिगे, विशाल धोत्रे यांना जामीन मिळालेला आहे.

गुन्हा दाखल झालेल्यांपैकी विशाल धोत्रे यांच्यावर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. उर्वरित ४ व्यक्तींवर दोषारोपपत्र दाखल करणे बाकी आहे.
(२) व (३) अवैध सावकारीबाबत उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांच्या कार्यालयात एकुण ३१ तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्यातील ९ तक्रारींमध्ये गुन्हा दाखल झालेला आहे. तर १५ तक्रारींमध्ये सुनावणी सुरु असुन महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम १८ अन्वये ५ तक्रारींवर कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत ५ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) शहरातील उर्वरित घरांच्या पुनर्वसनाबाबत

**(३८) ६८२२६ (२७-०८-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) शहरातील उर्वरित घरांच्या पुनर्वसनास (टप्पा क्र.४) ला खास बाब म्हणून परवानगी देणे, आदिशक्ती संत मुक्ताई मंदिराचे प्रलंबित काम पूर्णत्वास नेण्याकरिता तात्काळ निधी उपलब्ध करावा, तसेच सिंचनाचे निधी अभावी प्रलंबित प्रकल्पाकरिता निधी देण्यासंदर्भातील दिनांक १७ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२०-११-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे. जळगाव जिल्हयातील मुक्ताईनगर शहरातील उर्वरित घरांच्या पुनर्वसनास (टप्पा क्र.४ ला) तात्काळ मंजुरी मिळण्याबाबत मा. श्री. चंद्रकांत निंबाजी पाटील विधानसभा सदस्य, मुक्ताईनगर, जि.जळगाव यांनी मा. मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांना सादर केलेले दिनांक १७/५/२०२२ रोजीचे निवेदन उचित कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी,जळगाव यांना पाठविण्यात आलेले आहे. मात्र सदर निवेदनात आदिशक्ती संत मुक्ताई मंदिराचे प्रलंबित काम पूर्णत्वास नेण्याकरिता तात्काळ निधी व सिंचनाचे निधी अभावी प्रलंबित प्रकल्पाकरिता निधीबाबतच्या मुद्यांचा समावेश नाही.

(२) टप्पा क्र.४ मधील उर्वरित घरांच्या पुनर्वसनासंदर्भात अधिक्षक अभियंता,जळगाव पाटबंधारे मंडळ यांनी त्यांच्यामार्फत तापी पाटबंधारे महामंडळ यांच्या नियामक मंडळासमोर मान्यतेसंदर्भात प्रस्ताव सादर केलेला असून अधिक्षक अभियंता यांच्याकडून प्रस्ताव नियामक मंडळाच्या निर्णयासह प्राप्त झाल्यानंतर शासनास अहवाल सादर करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिनांक १/९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले आहे. प्रस्ताव

शासनास प्राप्त झाल्यानंतर त्वरीत कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री नियंत्रण कक्ष उभारण्याबाबत**

**(३९) ६८५२८ (२५-०८-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अहमदनगर जिल्हयात प्रथमच जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री कक्ष सुरु केल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील विकास योजनांसह ई-सेवाबाबतची माहिती एका क्लिकवर पालकमंत्र्यांना तात्काळ समजणार असून कोणती योजना राबविण्यात कोणत्या अडचणी येतआहेत याची सविस्तर माहितीही समजणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री नियंत्रण कक्ष उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१), (२) व (३) दिनांक २६.०५.२०२३ रोजी अहमदनगर जिल्हयात "पालकमंत्री वॉर रुम" (GM WAR ROOM) या नावाने योजनांच्या आढाव्यासाठी सदर कक्षाचे उद्घघाटन करण्यात आले आहे. सदर कक्षामार्फत केंद्र, राज्य, जिल्हा पातळीवरील महत्वाचे प्रकल्पांबाबत सर्व संबंधित कार्यालयप्रमुखांसमवेत प्रत्येक मंगळवारी आढावा घेऊन संबंधितांना महत्वाचे प्रकल्प विहित मुदतीत पुर्ण होण्याकामी सुचना दिल्या जातात.
संबंधित जिल्हयांच्या पालकमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार अहमदनगर, सोलापूर, रायगड, भंडारा, चंद्रपुर, अमरावती, अकोला, बुलढाणा व धाराशीव येथे "पालकमंत्री नियंत्रण कक्ष" सुरु करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विभागाच्या संचलित गोंदिया जिल्ह्यातील एकलव्य मॉडेल निवासी शाळेतील जेईई परीक्षा पास विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काअभावी परीक्षेस बसता येत नसल्याबाबत**

**(४०) ६९३८८ (१०-१०-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरी (जि. गोंदिया) तालुक्यातील आदिवासी विभागाच्या संचलित बोरगाव येथील एकलव्य मॉडेल निवासी शाळेतील सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी बारावी शिकणारी जेईई मेन परीक्षेत बसलेल्या २७ मुलांपैकी १७ मुले ॲडव्हान्स परीक्षेत उत्तीर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देवरीच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी अति दुर्गम आदिवासी भागातील मुलांची आर्थिक स्थिती बिकट असल्याने ॲडव्हान्स परीक्षेचे चौदाशे पन्नास रुपये शुल्क निवासी शाळेमार्फत भरण्यात यावे अशी मागणी आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तांकडे दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी आयुक्तांनी विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क भरण्यास नकार दिल्याने सदर आदिवासी गुणवंत विद्यार्थ्यांना जेईई मेन परीक्षेत यश मिळूनही परीक्षा शुल्क भरु न शकल्याने ॲडव्हान्स परीक्षेस बसता आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (१७-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
जेईई मेन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या १८ विद्यार्थ्यापैकी १६ विद्यार्थ्यांनी १२ वीच्या CBSE बोर्डाच्या परीक्षेचा अभ्यास करण्यास प्राधान्य दिले. उर्वरित फक्त २ विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्स परीक्षा देण्याची तयारी दर्शविली व त्यांचे परीक्षा शुल्क शाळा स्तरावर भरण्यात आले, परंतू त्या २ विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्स परीक्षेसाठी अभ्यासाची तयारी कमी असल्याने परीक्षेस बसले नाही.
(४) व (५) दिनांक २६ व २७ मे, २०२३ रोजी प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी आयोजित कार्यशाळेत सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत इयत्ता १२ वी मध्ये "शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची JEE/NEET यासारख्या परीक्षेचा फार्म भरण्यासाठीचा खर्च शालेय निधीतून भागविण्यात यावा". असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार आयुक्त, आदिवासी विकास यांनी दिनांक १९ जून, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व प्राचार्य एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कुल यांना शालेय निधीतून खर्च भागविण्यांबाबत कळविले आहे.

---

### उमरेड (जि.नागपूर) येथे अवकाळी पावसामुळे रोजगार हमी योजनेचे नुकसान झाल्याबाबत

**(४१) ६९४७२ (२९-०८-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड (जि.नागपूर) येथे माहे एप्रिल, २०२३ पासून सुरु असलेल्या अवकाळी पावसामुळे रोजगार हमी योजनेच्या कामाचे नुकसान झाल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रोजगार हमी योजनेतून मंजूराना कामे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मागणीप्रवण योजना असुन अंगमेहनतीचे काम करण्यास इच्छुक प्रौढ व्यक्तीने विहित प्रपत्रात कामाची मागणी तो राहात असलेल्या ग्रामपंचायतीकडे केल्यास त्याला ग्राम पंचायतीकडे तांत्रिक व प्रशासकिय मान्यता प्रदान केलेल्या कामांतुन (शेल्फ) कामे पुरविली जातात.
माहे जुन २०२३ या महिन्यात मगांराग्रारोहयो अंतर्गत ७२६ कुटूंबाला १२०२३ मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये १५७ कामे हाती घेण्यात आली असुन त्यापैकी १० कामे पूर्ण झाली आहेत व १४७ कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे अवकाळी पावसामुळे ता. उमरेड जि. नागपूर येथे रोजगार हमी योजनेच्या कामाचे नुकसान झाले नसल्याचे दिसून येते.
(३) विलंब झालेला नाही.

---

### धालेवाडी, कोथळे व रानमळा (ता.पुरंदर, जि.पुणे) या गावात बिबट्याचा वावर वाढल्याबाबत

**(४२) ६९७३९ (२९-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा),**

**श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धालेवाडी, कोथळे व रानमळा (ता.पुरंदर, जि.पुणे) या गावात माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान बिबट्याचा वावर वाढल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरीकांनी वन विभागाला माहिती दिली असता वनविभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन नागरी वस्तीतील नागरीकांचा बळी जाऊ नये याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०१-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर घटनेची माहिती मिळताच अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन नागरिकांशी संवाद साधून ग्रामस्थांसमवेत बिबट्या आढळलेल्या ठिकाणाची पाहणी करुन तेथिल ठस्यांचे फोटो घेतले.

(३) बिबट्याचा वावर असलेल्या परिसरामध्ये क्षेत्रिय कर्मचाऱ्यांमार्फत गस्त करण्यात आली तसेच सदर परिसरामध्ये वावरताना नागरिकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत जनजागृती करण्यात आली.

याव्यतिरीक्त विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार वन्यप्राण्यांचे हल्ल्यामुळे मनुष्य मृत्यू, अपंगत्व गंभीर जखमी व किरकोळ जखमी झाल्यास अर्थसहाय्य अदा करण्यात येते.
- वेळप्रसंगी मानवी जिवितास धोकादायक ठरलेल्या बिबट प्राण्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतुदींच्या अधिन राहून जेरबंद करण्याची देखील कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## मंगळवेढा येथे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत कामाकरिता हजेरी पत्रकावर ग्रामसेवकांनी सह्या करण्यास दिलेला नकार

**(४३) ६९७७३ (२७-०८-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (सोलापूर) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत कामाकरिता ग्रामसेवकांनी हजेरी पत्रकावर सह्या करण्यास नकार दिल्यामुळे घरकुल व विहिर लाभार्थी अडचणीत आले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेच्या कामाकरिता हजेरी पत्रकावर ग्रामसेवकांनी सह्या न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त योजनेची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२९-११-२०२३) :** (१) हे खरे नाही. मंगळवेढा गटाकडील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत घरकुल तसेच विहीरींची कामे सुरू असून मंगळवेढा गटाकडील प्राप्त असलेली मस्टर मागणी व हजेरी पत्रकांवर ग्रामसेवकांच्या स्वाक्षरी असून त्या मागणीनुसार कामे सुरू आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोक व वस्मा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या जागेवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(४४) ७०११० (२७-०८-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोक व वस्मा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था यांच्या जागेवर काही लोकांनी जाणीवपूर्वक अतिक्रमण केले असून यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहाय्यक निबंधक यांच्याकडे तक्रार करुनही अद्यापपर्यंत संबंधितांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सोसायटीच्या जागेवरील अतिक्रमण काढण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांना दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार शासनाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०५-१२-२०२३) :** (१) नाही.
मा. श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), विधानसभा सदस्या यांच्या दिनांक ०८/०२/२०२३ च्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. जिंतूर यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत.
त्यानुसार मौजे कोक/वस्मा ता. जिंतूर जि. परभणी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्ष/सचिव यांना सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. जिंतूर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३६ अन्वये कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. तसेच अतिक्रमण काढणेबाबतची कार्यवाही संस्था स्तरावरील असल्यामुळे संस्थेस पुन:श्च दि. २६/०६/२०२३ रोजी पत्र देण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
लोकप्रतिनिधी यांनी असे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक ०८/०२/२०२३ रोजी दिले आहे.
(३) सदर बाब संस्था स्तरावरील असल्यामुळे अतिक्रमण काढणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३६ अन्वये कार्यवाही करणेबाबतच्या सूचना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्या कार्यालयाकडून सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. जिंतूर यांना देण्यात आल्या आहेत. तसेच सदरील जागेच्या मालकी हक्काबाबत पुरावा शोधण्याचे काम संस्था स्तरावर सुरू आहे. जागेच्या मालकीबाबतचा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात वन विभागातील अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षकाची अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(४५) ७०५८४ (११-०९-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात वन विभागातील अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षकाची अनेक पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने सर्व रिक्त पदे भरण्याऐवजी फक्त एकच अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षकाचे पद भरल्याने इतर अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी परसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वन विभागातील सर्वच पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०१-२०२४) :** (१) व (२) वन विभागामध्ये अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक या श्रेणीतील पद उपलब्ध नसून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रेणीतील पद आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे कार्यालयात व अधिनस्थ वन विभागांतर्गत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षकाचे पद मंजूर नाही. तथापि, चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर यांचे कार्यालयात अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रेणीचे मंजूर पद असून सदर पद भरलेले आहे.
(३) वन विभागातील भारतीय वन सेवा संवर्गातील पदे बदलीने/पदोन्नतीने व गट-अ व ब संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. तसेच वन विभागांतर्गत अराजपत्रित गट-ब, गट-क व गट-ड मधील रिक्त पदे अनुक्रमे राज्यस्तरीय, प्रादेशिकस्तरीय व जिल्हास्तरीय निवड समित्यांमार्फत भरण्याची कार्यवाही प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शेवाळी-नेत्रंग राष्ट्रीय महामार्गावर डेरेदार वृक्षांचे पुनर्रोपण करण्याकडे दुर्लक्ष झाल्याबाबत**

**(४६) ७०८१६ (११-०९-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेवाळी-नेत्रंग राष्ट्रीय महामार्गाच्या विस्तारीकरणाच्या कामासाठी अनेक डेरेदार वृक्षांची वृक्षतोड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गाच्या कामासाठी वृक्षतोड करण्यात आलेल्या शेकडो डेरेदार वृक्षांच्या बदल्यात दोन वा तीन पटीने पर्यायी वृक्ष लागवड करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच याप्रकरणी किती डेरेदार वृक्ष तोडण्यात आले व त्यापैकी किती वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आले आहे,
(४) असल्यास, ज्या वृक्षांचे पुनर्रोपण करता येणे शक्य होते तरी, संबंधित ठेकेदाराने केले नसल्याने वनविभागाने त्या ठेकेदारावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१२-२०२३) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम १९६४ नुसार वृक्ष अधिकारी निर्देश देतील त्याप्रमाणे नंदुरबार वनविभागात सदर प्रकरणी ३०० झाडे तोडण्यात आलेली आहेत त्याबाबत संबंधीत यंत्रणेने दिलेल्या हमीपत्रानुसार जेवढी झाडे तोडण्यात येतील त्याचे ५ पट झाडे ही सन २०२४ च्या पावसाळयात लावण्याचा शर्तीवर सदर झाडे तोडण्यास परवानगी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही,
(५) प्रश्न उद्भवत नाही,

---

**दिंडोरी( जि नाशिक) येथे अकृषक परवानगी न घेतल्याने बंद केलेली कंपनी नव्याने सुरु करण्यासाठी प्रांत अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारल्याबाबत**

**(४७) ७०९०६ (३१-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिंडोरी ( जि. नाशिक) येथील अकृषिक परवानगी न घेतल्याने बंद केलेली कंपनी पुन्हा सुरु करण्यासाठी ५० लाखांची लाच मागून तडजोडीअंती ४० लाख रुपयाची लाच प्रांत अधिकाऱ्याकडून स्वीकारण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकृषक परवानगी न घेतल्याने संबंधित कंपनी मालकास उत्पादन बंद करुन कंपनी पुन्हा सुरु करण्यासाठी सदरची लाच मागण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वसामान्य नागरिकांकडून देखिल महसूल प्रशासनातील अधिकारी कर्मचारी लाच मागत असून महसूल विभागात मोठ्या प्रमाणात लाचखोरीचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :** (१) व (२) तत्का. उपविभागीय अधिकारी, दिंडोरी उपविभाग यांनी तक्रारदार यांच्या कंपनीस अकृषिक परवानगी न घेतल्याच्या कारणास्तव नोटीस बजावली होती. सदर नोटीशीच्या अनुषंगाने कारवाई न करण्यासाठी व कंपनीचे प्रोडक्शन पुन्हा सुरु करण्यासाठी तत्कालीन उपविभागीय अधिकारी, दिंडोरी उपविभाग यांनी दिनांक २२/०५/२०२३ रोजी तक्रारदार यांचेकडे ४०,००,०००/- रुपये मागणी करून उक्त लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याच्या आरोपावरुन तत्का. उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांच्या विरुध्द दिंडोरी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.२८/०६/२०२३ रोजी १५.५१ वाजता गु. र. नं. ३३१/२०२३ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) अशी बाब नाही.
(४) सदर दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तत्का. उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांना दि.०४.०९.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे, तसेच त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) अशी बाब नाही.

---

## बीड विधानसभा मतदारसंघातील तलाठी संवर्गीय कर्मचारी यांच्या बदल्याबाबत

**(४८) ७१२६९ (०१-११-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा मतदारसंघातील उपविभागातील तलाठी संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या सन २०२३ च्या नियतकालीक बदल्या व पदस्थापना करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे राज्य शासनाचा सेवक किंवा कर्मचारी यांचा एखाद्या पदावर असण्याचा कालावधी तीन व सहा वर्षाचा असतो तसेच सहावर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यानंतर तालुक्याच्या बाहेर प्रशासकीय बदली होणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील तलाठयाचा सन २०२३ च्या नियतकालीत बदल्यामध्ये निकष पाळला गेला नसल्याने तालुक्यामध्ये सहा वर्षापेक्षा जास्त कालावधीची तलाठयाची सेवा झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बदल्यामध्ये शासनाच्या नियमाचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ चे कलम ३ (१) नुसार गट-क मधील बिगर सेक्रेटरिएट सेवेतील कर्मचारी असेल तर,अशा कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदावर दोन पूर्ण पदावधीची सेवा पूर्ण केल्यानंतर त्याची त्या कार्यालयातून किंवा विभागातून दुसऱ्या कार्यालयात किंवा विभागात बदली करण्यात येईल.

तलाठी हा गट - क संवर्गातील कर्मचारी असून तलाठी पदासाठी मुख्यालय हे तलाठी सजा आहे. शासन निर्णय दि.१८.०९.२०२३ अन्वये तलाठी (गट-क) संवर्गाची आस्थापना जिल्हास्तरावर निश्चित करण्यात आली आहे.

(३) तलाठी संवर्गातील कर्मचारी यांचा एका सजावर/पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्ष व सहा वर्ष असुन ज्या तलाठ्यांना तीन व सहा वर्ष कालावधी पूर्ण झालेला आहे अशा तलाठ्यांची बदली अधिनियमानुसार व शासन निर्णयातील तरतुदीनुसार नागरी सेवा मंडळाची बैठक घेऊन, कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या विकल्पानुसार तसेच नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी नुसार प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य' वर्ष साजरे करण्याबाबत

**(४९) ७१४१९ (२९-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' साजरे करण्यासाठी 'महाराष्ट्र श्री अन्न अभियान' सुरु करुन त्यासाठी २०० कोटींची तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियानांतर्गत भरड धान्य उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाचा प्रसार, पिक प्रात्यक्षिके, मूल्यसाखळी विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात कृषी महोत्सव, रोड शो, मिलेट दौड यांसारखे फक्त उत्सवी उपक्रम राबविले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अभियानांतर्गत या वर्षी भरड धान्य लागवडीखालील किती क्षेत्र वाढले आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, सन २०२३ च्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना ५० लाख भरड धान्य बियाणांचे कीट वाटप करण्यात येणार असल्याचे शासनाने जाहीर केल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना बियाणांचे कीट वाटप करण्याबाबत व शालेय मुलांच्या पोषणासाठी तसेच भरड धान्य पिकवण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शाळांच्या मध्यान्ह भोजनात भरड धान्याचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-१०-२०२३) :**(१) संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष" म्हणून घोषित केले आहे. "आतंरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३" राज्यामध्ये साजरे करण्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही तर, विभागाच्या विविध योजनांच्या निधीतून या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. दि.०९ मार्च,२०२३ रोजी मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी अर्थसंकल्पामध्ये, "महाराष्ट्र श्री अन्न (Millets) अभियान" घोषित केले आहे. या घोषणेच्या अनुषंगाने राज्यामध्ये महाराष्ट्र श्री अन्न (Millets) अभियान राबविण्यासाठी दि.१७ एप्रिल, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच सदर शासन परिपत्रकान्वये या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी अन्न व पोषण सुरक्षा योजना, आत्मा योजना, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया व मुख्यमंत्री कृषि अन्न प्रक्रिया योजना, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प या विभागाच्या योजनांच्या तरतुदीतून पौष्टिक तृणधान्याची उत्पादन वाढ, निविष्ठा, आहारातील वापर वाढ इत्यादी बाबींसाठी खर्च करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

कृषि विभागामार्फत राज्यात राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान ३१ जिल्हयात राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पौष्टिक तृणधान्य लागवडीसाठी पिक प्रात्याक्षिके, बियाणे वितरण, शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मिनिकीट, बियाणे उत्पादन, एकात्मिक अन्न व किड व्यवस्थापन, हया बाबी राबवून शेतक-यांना अनुदानावर बियाणे, जैविक खते व

औषधे दिली जातात, तसेच शेतकरी प्रशिक्षणाच्या माध्यमातून पिकांचे लागवड तंत्रज्ञान पुरविले जाते.

याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्र मिलेट मिशन ३४ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र मिलेट मिशन अंतर्गत सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्याक्षिके, शेतीशाळा, प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रदर्शन, रोड शो, कृषि महोत्सव व विविध माध्यमांद्वारे प्रसिद्धी इत्यादीद्वारे पौष्टिक तृणधान्याच्या उत्पादन वाढ व आहारातील वापर वाढविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) पौष्टिक तृणधान्य पिकाखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता

(क्षेत्र लाख हे.उत्पादन लाख मे.टन व उत्पादकता किलो/हे.)

| पौष्टिक तृणधान्य पिके | सरासरी (२०१६ -२१) | सन२०२१-२२ | सन २०२२-२३ |
|---|---|---|---|
| क्षेत्र(लाख हे. ) | २९.०० | ३०.९३ | २०.३५ |
| उत्पादन (लाख मे. टन) | २३.१३ | २८.९८ | २०.७७ |
| उत्पादकता (किलो/हे.) | ७९८ | ९३७ | १०२१ |

- सन १९९० या दशकापासून सोयाबीन, तूर व ऊस हरभरा पिकांच्या क्षेत्र वाढीमुळे तृणधान्य पिकांचे क्षेत्रात घट झाली आहे.
- सिंचन सुविधा व पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेतकऱ्यांचा कल अधिक उत्पन्न देणाऱ्या नगदी पिकांकडे वाढला आहे.
- पौष्टिक तृणधान्य पिकाचे आहारातील पोषणमूल्यांबाबत जनमाणसातील जागरूकतेअभावी मागणी कमी झाल्याने त्याचा परिणाम क्षेत्र घटीवर दिसून येतो.

सन २०२२-२३ मध्ये क्षेत्र घटीमुळे उत्पादनात घट दिसून येते तथापी या पिकांच्या उत्पादकतेमध्ये वाढ झालेली आहे.

(४) सन २०२३ २४ मध्ये आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने या पिकांचे क्षेत्र वाढीसाठी उत्पादन वाढीच्या बाबीसोबतचा ( पिक प्रात्यक्षिके, बियाणे वितरण, INM/IPM , प्रशिक्षणे, शेतकरी शेती शाळा इ.) शेतक-यांना ही पिके पिकविण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी शेत तिथे पौष्टिक तृणधान्य अंतर्गत ५० लाख बियाणे मिनिकीट मोफत वाटपाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(५) कृषि विभागामार्फत राज्यात राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान ३१ जिल्हयात राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पौष्टिक तृणधान्य लागवडीसाठी पिक प्रात्याक्षिके, बियाणे वितरण, शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मिनिकीट, बियाणे उत्पादन, एकात्मिक अन्न व किड व्यवस्थापन, हया बाबी राबवून शेतक-यांना अनुदानावर बियाणे, जैविक खते व औषधे दिली जातात, तसेच शेतकरी प्रशिक्षणाच्या माध्यमातून पिकांचे लागवड तंत्रज्ञान पुरविले जाते.

याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्र मिलेट मिशन ३४ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र मिलेट मिशन अंतर्गत सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्याक्षिके, शेतीशाळा, प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रदर्शन, रोड शो, कृषि महोत्सव व विविध माध्यमांद्वारे प्रसिद्धी इत्यादीद्वारे पौष्टिक तृणधान्याच्या उत्पादन वाढ व आहारातील वापर वाढविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत,

i) केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. प्रस्तुत योजनेतंर्गत राज्य व केंद्र शासनाच्या शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील इ. १ ली ते इ.८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येतो.

ii) सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या बैठकीमध्ये राज्याचा वार्षिक कार्यक्रम अंदाजपत्रक व आराखडा सादर करताना विद्यार्थ्यांना आठवडयातील एक दिवस पौष्टिक पोषण आहार देण्याच्या दृष्टीने तृणधान्याची मागणी केंद्र सरकारकडे नोंदविण्यात आली आहे.केंद्र शासनाकडून राज्यास तृणधान्य प्राप्त झाल्यास राज्यातील

विद्यार्थ्यांना प्रस्तुत योजनेतंर्गत आठवडयातील एक दिवसासाठी तृणधान्ययुक्त पौष्टिक पोषण आहार देण्याचे प्रस्तावित आहे.
iii) यासह, नागरी भागातील शाळांमध्ये बचत गटामार्फत आठवडयातून एकदा राजगीरा लाडू/ फळ/ चिक्की/ खजूर इ. पदार्थाचा पुरक आहार देण्यात येतो.
iv) प्रस्तुत योजनेंतर्गत सद्यस्थितीत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने दि.१५ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उपअधिक्षक, भुमिअभिलेख कार्यालय, बीड येथे होत असलेली अनियमितता

**(५०) ७१४६० (२८-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालयात विविध कामांसाठी नागरिक येत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपअधिक्षक व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी नियमानुसार होत असलेल्या कामाला किंवा होत नसलेल्या कामाला मोठ्या प्रमाणात आर्थिक मागणी करण्यात येते व सदर मागणी पूर्ण न झाल्यास अनेक महिने अथवा अनेक वर्ष नागरिकांचे कामकाज होण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी केलेल्या तक्रारीसंदर्भात चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी विभागाकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यापुर्वी देखिल या कार्यालयांतर्गत झालेल्या अनियमिततेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सातत्याने पत्रव्यवहार केला त्यानुषंगाने चौकशी अथवा कार्यवाही झालेली दिसून येत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे लोक प्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने उप अधीक्षक भूमि अभिलेख, बीड कार्यालयातील कामकाजाची माहे मे व जून, २०२३ मध्ये तपासणी करण्यात आली असून तपासणीमध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने श्री.एम.के.मुंडे उपअधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचेविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.